**NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(दुपार)

**दिनांक ३१.०७.२०२६ शुक्रवार**

**(कामगिरी)**

**१) गुन्हेशाखा युनिट क्र. ३ पोलीसांची कामगिरी :—एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक ३१.०७.२०२६ चे ०३.३० ते ०६.३० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ३ चे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे भांडेवाडी हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, वैष्णवी देवी नगर येथील विस्टा टॅटु स्टुडीओचे बाजुला काही इसम होंडा सिटी कार व मोपेड घेवुन संशयास्पद उभे असून ते पुडीतुन अंमली पदार्थ विक्री करीत आहे. अशा माहितीवरुन, घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता, मिळालेल्या वर्णनाचे दोन इसम होंडा सिटी कार क्र. एमएच ३१ ईके ७६१८ व मोपेड सुझुकी ॲक्सेस क्र. एमएच ४९ बीजी ३८०८ जवळ संशयास्पद दिसून आले. त्यांचे जवळ जावुन, त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी आपले नाव १) मोहम्मद नियाज समसुल अन्सारी, वय ३४ वर्ष, २) मोहम्मद असलम समसुल अन्सारी, वय ३४ वर्ष, दोघेही रा. स्वामीनारायण मंदीर चे बाजुला, प्लॉट क्र. ७२, राजनगर, वाठोडा, भांडेवाडी, नागपूर असे सांगितले. त्यांचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरुन, एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन, पंचासमक्ष कायदेशिररित्या त्यांचे वाहनांची व अंगझडती घेतली असता, कार व मोपेड चे डिक्कीमध्ये झिपलॉक पन्नीमध्ये अंमली पदार्थ एम.डी. पावडर वजनी १५१ ग्राम किंमती ३०,२०,०००/—रू. ची मिळून आली. आरोपींना अंमली पदार्थ बाबत विचारपुस केली असता, त्यांनी त्यांचा साथीदार पाहीजे आरोपी नामे विशाल उर्फ फल्ली गुप्ता, रा. वाठोडा, नागपूर याचे मदतीने विक्रीकरीता आणल्याचे सांगितले. आरोपींचे ताब्यातुन अंमली पदार्थ विक्रीचे रोख ३,६००/—रू., एम.डी. पावडर, ०१ मोबाईल फोन, ईलेक्ट्रॉनिक वजन काटा, होंडा सिटी कार व ईतर साहीत्य असा एकुण ४३,७४,६००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींचा गुन्हे अभिलेख तपासला असता, आरोपी क्र. १ याचेविरुध्द एनडीपीएसचा गुन्हा तर आरोपी क्र. २ याचेविरुध्द खुनाचा गुन्हा आणि पाहिजे आरोपी याचेविरुध्द खुनाचा, खुनाचा प्रयत्न, अपहरण, दरोडा व भा.ह.का. अन्वये गुन्हे दाखल असल्याचे दिसून आले. आरोपींना मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव भांडेवाडी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. अतुल मोहनकर, सफौ ईश्वर खोरडे व त्यांचे पथकाने केली.



**२) गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथक पोलीसांची कामगिरी :—एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ३१.०७.२०२६ चे ००.०५ वा. ०३.०० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोध पथकाचे अधिकारी व अंमलदार हे अंमली पदार्थ विक्री करणारे आरोपींचे शोधार्थ पेट्रोलींग करीत असतां, त्यांना पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत बेझनबाग परिसरातील कामठी रोड, अश्विन अमृततुल्य समोर एक इसम वय अंदाजे २५ ते ३० वर्ष वयोगटातील एका विना नंबरप्लेट चे ॲक्टिवा मोपेडजवळ कोणाची तरी वाट पाहत असतांना संशयीतरित्या दिसून आला. त्याचेजवळ जात असता, तो पोलीसांना पाहून पळू लागला. त्याचा पाठलाग करुन त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने आपले नाव अमन मुकेश मोटघरे वय २६ वर्ष, रा. लाईन क्र. १, प्लॉट क्र. ६७८, न्यु इंदोरा, मायानगर, जरीपटका, नागपूर असे सांगितले. त्याचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरुन, एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन, पंचासमक्ष कायदेशिररित्या त्याची व त्याचे ताब्यातील मोपेडची झडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे खिशात तसेच, गाडीचे डिक्कीमध्ये झिपलॉक पन्नीमध्ये अंमली पदार्थ एम.डी. पावडर मिळून आली. आरोपीचे ताब्यातुन एम.डी. पावडर वजनी १८.६०० ग्राम, एक आयफोन व विना नंबरप्लेटची ॲक्विवा मोपेड असा एकूण किंमती ३,४६,०००/—रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला. आरोपीस अंमली पदार्थ बाबत विचारपुस केली असता, त्याने त्याचा साथीदार पाहीजे आरोपी नामे प्रतिक ढवले वय २५ वर्ष रा. मायानगर, इंदोरा, नागपूर याचेकडून खरेदी करुन विक्रीकरीता आणल्याचे सांगितले. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव जरीपटका पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भारत क्षिरसागर, पोहवा रत्नाकर कोठे, अरविंद गेडेकर, शैलेष दोबोले, शेषराव रेवतकर, मपोहवा अनुप यादव, पोअं संतोष शेंद्रे, नितीन राठोड, धनपत मंजरेटे, धनराज मसराम व चापोअं राहुल पाटील यांनी केली.

**३) नागपूर शहर पोलीसांची जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ३०.०७.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०२ केसेसमध्ये ०२ ईसमावर कारवाई करून एकुण २,९२०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०२ केस मध्ये १३ इसमांवर कारवाई करुन १५,७००/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आ आहे. वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,९१६ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,८३,१५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक ३०.०७.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक ३१.०७.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये एकुण ०१ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**(शिक्षा)**

**मा. न्यायालयातुन आरोपीला सश्रम कारावासाची शिक्षा :—**

दिनांक ३०.०७.२०२६ रोजी, मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी नागपुर, श्री. ए.एन. जगताप साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे केस क्र. ३२२९६२/२०१५ मधील, पोलीस ठाणे सक्करदरा येथील अप. क्र. २४०/२०१५ कलम २७९,३३७,३३८,३०४(अ) भा.दं.वि. या गुन्ह्यातील आरोपी गोपाल नामदेवराव खेडकर, वय २५ वर्षे,

रा. लिंगा, तह. कळमेश्वर, जि. नागपुर याचेविरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, **आरोपीस कलम ३०४(अ) भा.दं.वि. अन्वये ०६ महीने सश्रम कारावास व २५,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०१ महिना साध्या कारावासाची तसेच, कलम २७९ भा.दं.वि. अन्वये ०१ महीना सश्रम कारावास व १,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास १५ दिवस साध्या कारावासाची तसेच, कलम ३३८ भा.दं.वि. अन्वये ०१ महीना सश्रम कारावास व १,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास १५ दिवस साध्या कारावासाची तसेच, कलम १७७ मो.वा.का. अन्वये ५००/— रु. दंड व दंड न भरल्यास ०७ दिवस साध्या कारावासाची शिक्षा ठोठावली.**

दिनांक २०.०९.२०१५ चे १४.३० वा. चे सुमारास, फिर्यादी कृष्णा दौलतरावजी चाफले, वय ४९ वर्ष, रा. १५, साईबाबा नगर, खरबी, नागपूर हे त्यांचा तिनचाकी ऑटोरिक्षा क्र. एमएच ३१ सीव्ही ७०५६ ने पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीतील आवारी चौकातुन भांडेप्लॉट चौकाकडे जात असतांना, भांडेप्लॉट चौकाकडून येणाऱ्या टाटा सुमो गाडी क्र. एमएच ४० केआर ०६१८ चा चालक वर नमुद आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून, फिर्यादीचे ऑटोरिक्षाला जोरदार धडक दिली. त्यामुळे त्याचे मागुन येणारे होंडा शाईन मोटार सायकल क्र. एमएच ४० एएफ १५७० वरील स्वार नामे करण मनोहर विजयकर, वय २५ वर्ष यांचे गाडीवरील संतुलन गेल्याने, त्यांची दुचाकी ऑटोरिक्षाला धडकून ते दुचाकीसह उडाणपुलावरुन खाली पडून गंभीर जखमी झालो होते. तसेच, टाटा सुमो चालकाने त्याचे मागे असणाऱ्या मारोती ८०० कार क्र. एमएच ३१ एएच ३५१० ला सुध्दा धडक दिली. अपघातातील जखमी इसमांना उपचारार्थ मेडीकल हॉस्पिटल येथे नेण्यात आले होते. उपचारादरम्यान दुचाकी चालक करण विजयकर यास डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले होते. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सक्करदरा येथे आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपीला दिनांक २१.०९.२०१५ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तत्कालीन तपासी अधिकारी पोउपनि. एस.एम. मोवाल यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्रीमती मिनाक्षी करारे यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री. अनिल रॉय यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी मपोहवा. शुभांगी सावंत व मपोअं. शिल्पा ईटनकर यांनी काम पाहिले.

**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे कपीलनगरः— शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक ३०.०७.२०२६ चे २०.३० ते २०.४५ वा. चे दरम्यान, कपीलनगर पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, एनआयटी क्वॉर्टर समोर, जागेश्वर नावाचा इसस शस्त्र बाळगून उभा आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, तेथे एक इसम दिसून आला. त्यास जागेश्वर नावाने आवाज दिला असता, तो पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव जागेश्वर लहानुजी भोतमांगे, वय ५१ वर्षे, रा. प्लॉट क्र. ८९, रमाई नगर, नारी रोड, कपीलनगर, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे आत कंबरेत खोसलेला एक लोखंडी चाकु किंमती ३५०/— रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगुन समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोअं. रितेश वर्मा यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे कपीलनगर येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे हुडकेश्वर :— जुगार खेळणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ३०.०७.२०२६ चे १८.१५ वा. ते १८.५५ वा. चे दरम्यान, हुडकेश्वर पोलीसांचे पथक यांना मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे हद्दीत, घर नं. ३३१, गुरुदेव नगर बाजार, न्यु म्हाळगी नगर येथे राहणारा इसम आरोपी नामे १) सुमित बंडुजी दुनेदार, वय ३८ वर्ष याचे राहते घरी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, नमुद ठिकाणी पहिल्या माळयावर आरोपी क्र. २) भुषण दिगांबर बाभरटकर, वय २९ वर्षे, रा. गुरुदेवनगर, हुडकेश्वर ३) प्रविण शेषरावजी बरडे, वय ३६ वर्षे, रा. आशिर्वाद नगर, हुडकेश्वर ४) सतिश चरणदास तायडे, वय ३६ वर्षे, रा. म्हाळगी नगर, हुडकेश्वर ५) सुमित दिलीपराव बावणे, वय २९ वर्षे, रा. विठ्ठलनगर, हुडकेश्वर ६) राहुल महेंद्र गुप्ता, वय २७ वर्षे, रा. हुडकेश्वर खुर्द गाव ७) आदित्य संजय धाबेकर, वय ३३ वर्षे, रा. आशिर्वाद नगर, हुडकेश्वर ८) रजत अनिल उईके, वय ३० वर्षे, रा. जंबुदीप नगर, अयोध्यानगर ९) अमितकुमार जयनाथ गुप्ता, वय २६ वर्षे, रा. न्यु बिडीपेठ, सक्करदरा १०) अक्षय विलासराव व्यवहारे, वय ३४ वर्ष, रा. गुरुदेवनगर, हुडकेश्वर, ११) रोहीत विरेंद्रप्रसाद शाहू, वय ३० वर्ष, रा. भोलेनगर, पिपळा रोड, १२) प्रफुल्ल प्रमोद काटे, वय ३० वर्ष रा. पवारनगर, हुडकेश्वर, १३) प्रणय मुरलीधर अनेवार, वय २७ वर्ष, रा. न्यु नरसाळा, संभाजीनगर, हुडकेश्वर, नागपूर हे ताश पत्यावर पैश्याची बाजी लावुन हार—जीतचा जुगार खेळतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे ताब्यातुन डावावरील रोख ४,८००/—रू., तथा अंगझडतीतुन रोख ६०००/— रु, ५२ ताश पत्ते व ईतर साहित्य असा एकुण १०,८००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी सरतर्फे फिर्यादी पोउपनि. सुमेधकुमार जाधव यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे आरोपींविरूध्द कलम ४, ५ महा. जुगार प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पुढील तपास सुरु आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे बेलतरोडी :—** दिनांक ३०.०७.२०२६ चे १८.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत मनिषनगर, व्हिजन कारमेल शाळेजवळील नवनिर्माणाधीन इमारतीमध्ये हल्ली मुक्कामी राहणारे व तेथेच बांधकाम मिस्त्रीचे काम करणारे इसम नामे भुनेश्वर कर्मा गनजु, वय ४० वर्षे, रा. गाव कुरील ता. पंचायत धरुला, पोस्ट चकला, झारखंड हे नवनिर्माणाधीन बिल्डींगचे १२ वे माळ्यावर लोहा बांधण्याचे काम करीत असता, जोरदार पाऊस आल्याने, ते व त्याचे इतर सोबती कामगार हे खाली उतरत असतांना, नवव्या माळ्याचे पायरीवरुन त्यांचा पाय घसरल्याने ते इमारतीला बांधलेल्या जाळीवर पडून गंभीर जखमी झाले. बांधकामाचे ठेकेदार यांनी त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन त्यांना मृत घोषीत केले.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे पोउपनि. शिरीष सलगर यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. मुख्य दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३२४०६०० /२००३ | कलम ३७९ भा.दं.वि. | १) असलम खा अजीम खा अलीम खा रा. जुनारदेव, मटन मार्केट वस्ती, छिंदवाडा, मध्य | १७.०८.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | प्रदेश, ह.मु. अजनी रेल्वे क्वॉर्टर क्र. डी/१५/बी, अजनी, नागपूर.<br>२) गोपालसिंग नंदकिशोर ठाकूर रा. झॉशी, शिवरी बाजार, मध्यप्रदेश ह.मु. विश्वकर्मा नगर, गली क्र. ३, अजनी, नागपूर | |
| २. | मा. १५ वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०३६९३/२००७ | कलम ४७१, ४२०, ४६७, ४६८ भा.दं. वि. | भुपेंद्रसिंग किशोरसिंग चंडाले उर्फ चंदेल वय २७ रा. देविका अपार्टमेंट, साकेतनगर, फ्लॅट क्र. १०३, नागपूर | २७.०८.२०२६ |

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**